# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
## ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३
## सभावृत्तांत
## कार्यपत्रिका क्र. ११

दिनांक :- ३०/१/२०१५ वेळ :- दु. १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार दिनांक ३०/१/२०१५ रोजी दु. १२.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा. ओव्हाळ शेखर अशोक अध्यक्ष
२. मा.सुर्यंवशी आशा ज्ञानेश्वर
३. मा. शमीम पठाण
४. मा.अँड. चिंचवडे संदिप गुलाबराव
५. मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन
६. मा.गावडे जयश्री वसंत
७. मा.साबळे छाया जगन्नाथ
८. मा. जगताप विमलताई सुरेश
९. मा.पवार अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा
१०. मा.बारणे निलेश हिरामण
११. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
१२. मा.कलाटे स्वाती मयुर

खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. प्रशांत खांडकेकर - .क्षेत्रिय अधिकारी, मा.रविंद्र जाधव -,.प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, मा. रामदास तांबे - कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा , मा. के.डी.फुटाणे - उप अभियंता, स्थापत्य, मा.एन.आर.निंबाळकर – उपअभियंता स्थापत्य, मा.सी.बी.कोंडे – उपअभियंता, स्थापत्य, मा.व्ही.एन.देसले- उपअभियंता, पाणीपुरवठा, मा.एम.एम.चव्हाण, उपअभियंता, विदयुत विभाग, , मा.सुधाकर कुदळे – उपअभियंता, जलनिसारण विभाग, मा.मिनानाथ इनामदार – लेखाधिकारी, मा.जे.एन.जानकर – सहा.आरोग्याधिकारी, मा.जी.एस.देशपांडे – मुख्य आरोग्य निरिक्षक, इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष ओव्हाळ शेखर अशोक यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

**अ)** तदनंतर मागील कार्यपत्रिका क्र. १० नुसार दि.१७/१२/२०१४ रोजीच्या झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.अध्यक्ष यांनी प्रकट केले.

**उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र. ४. प्रभाग क्र.२४ प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह मधील गोलांडे चाळ , सुदर्शननगर येथील संडास ब्लॉक हटविणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे .

विषय क्र.५. थेरगांव स.नं.२२ आरक्षण क्र.६२८ खेळाचे मैदानास कै.चंदू मल्हारी बारणे क्रिडांगण असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे

----

ठराव क्र. २९ विषय क्र. १

दि. ३०/१/२०१५ विभाग : स्थापत्य

सुचक : मा. निलेश बारणे अनुमोदक: मा.सौ.विमलताई जगताप

संदर्भ :- मा.माया बारणे यांचा दिनांक २/१/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५१ बेलठिकानगर – गणेशनगर, गुजरनगर येथील सब-वे चे नामकरण कै.नागुभाऊ गतिराम बारणे असा ठराव मंजूर करण्यात आला होता. हा ठराव रदद करुन सदर सब-वे ला कै.नरहरी नामदेव गुजर, गुजरनगर थेरगांव असे नामकरण करणेत यावे त्याचप्रमाणे स.नं.३९ येथील रस्त्यास कै.नाना दगडू गुजर (गुजरनगर) , गणेशनगर येथील दुर्गा कॉलनीतील विविध रस्त्यांस दुर्गा कॉलनी क्र.१, दुर्गा कॉलनी क्र.२, दुर्गा कॉलनी क्र.३, दुर्गा कॉलनी क्रमांक ४, व दुर्गा कॉलनी क्रमांक ५, मंगलनगर येथील रस्त्यास जय गणेश कॉलनी, संतोषनगर येथील विविध रस्त्यांस संतोषनगर कॉलनी क्र.१, संतोषनगर कॉलनी क्रमांक २, व संतोषनगर कॉलनी क्रमांक ३, बेलठिकानगर येथील रस्त्यास मातोश्री कॉलनी , डांगे चौक येथील रस्त्यास श्री.महालक्ष्मी कॉलनी, गुजरनगर येथील रस्त्यास महादेव कॉलनी, गुजरनगर तुळजाई येथील रस्त्यास शिवराम कॉलनी, त्याप्रमाणे विठठल – रुख्मीणी कॉलनी, गुजरनगर थेरगांव असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्र. ३० विषय क्र. २

दि. ३०/१/२०१५ विभाग : स्थापत्य

सुचक : मा. सौ.स्वाती कलाटे अनुमोदक: मा.सौ.जयश्री गावडे

संदर्भ :- मा.स्वाती कलाटे यांचा दिनांक /१२/२०१४ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५३ वाकड मध्ये नामफलक व दिशादर्शक फलक पुढे नमुद केल्याप्रमाणे १) गेणभाऊ कलाटेनगर, २) एकता कॉलनी, ३) माउली चौक-वाकडरोड , नंदनवन कॉलनी ४) जानोबा चौक-वाकडरोड, आर.के.लाईफ, शिव पार्वती, आयोध्यानगरी, पलाश, मॅक्सीमा, कलाटे हाईटस, आश्रय, सोसायटीकडे, ५) साई सेवा कॉलनी, ६) यमुनानगर – कस्तुरी अँप्रास्टॉपी, रिगालिया, प्लॅटीनम टॉवर, क्रिस्टल हाईटस, हॉरीझन, सिल्वर स्कायस्कॅप सोसायटीकडे ७) कै.आनंदा बोडके मार्ग, ओमेगा पॅराडाईज, शोनेस्ट टॉवरकडे ८) भाऊसाहेब कलाटेनगर १, २ ९) भगवाननगर , साईव्हीला व्हीस्टा सोसायटीकडे १०) वाकड चौक ११) रमाबाई आंबेडकर कॉलनी, आयलॅन्ड, ईडन गार्डन, ईडन टॉवर, गोल्डन पाम, , मधुपुष्पा, लॅटीटयुड सोसायटीकडे १२) शेख वस्ती १३) कै.तुकाराम (नाना) कलाटेनगर, १४) शेडगेवस्ती १५) वाकड गावठाण , म्हातोबा मंदीर, हनुमान मंदीर चौक, स्मशानभूमी, मुळा नदी, आलमगीर मस्जीद, रोहन तरंग, माऊंट वर्ट वन सोसायटीकडे जाणारा रस्ता, १६) महात्मा गांधी रोड (पिंक सिटी) कावेरीनगर पोलीस वसाहत मनोहर पार्क, कॅलीस्ट्रो, पिंक सिटी (कोलतेपाटील), पलाश प्लस, मालपाणी, कल्पतरु स्प्लेडॉर युरो स्कुल, माऊंट व्हर्ट ट्रोपेज सोसायटीकडे १७) ममतानगर १८) स्मशानभमीकडे

जाणारा मार्ग १९) महात्मा गांधी रोड माऊंट व्हर्ट ट्रोपेज कल्पतरु हार्मोनिया सोसायटीकडे असे नामकरण करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा विषय मा. प्रभाग समितीपुढे आला असता , मा.शमीम पठाण यांनी पुढीलप्रमाणे उपसुचना मांडली.

ब प्रभागातील सर्व वॉर्डात आवश्यकतेनुसार व मा.सदस्यांच्या मागणीनुसार प्रभागाच्या मिटींगमध्ये मंजूर केलेले नामफलकाचे फलक लावणे तसेच दिशादर्शक फलक लावणे, बिल्डींगच्या नावांसह फलक लावणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव उपसुचनेसह सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्र. ३१ विषय क्र. ३
दि. ३०/१/२०१५ विभाग : लेखा विभाग
सुचक : मा. सौ.शमीम पठाण अनुमोदक: मा.सौ.जयश्री गावडे

संदर्भ :- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.बक्षे/लेखा/९/३६/२०१५,
दिनांक २३/१/२०१५

ब क्षेत्रीय कर्यालयाचे सन २०१४-२०१५ चे सुधारीत व सन २०१५-२०१६ चे मुळ अंदाजपत्रक मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ (सुधारित नांव THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT (Act No LIX of 1949) चे कलम २९ (अ) मधील कलम ७ चे पोटकलम (ब) नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्र. ३२ विषय क्र. ४
दि. ३०/१/२०१५ विभाग : स्थापत्य
सुचक : मा. सौ. जयश्री गावडे अनुमोदक: मा.सौ.आश्विनी ग.चिंचवडे

संदर्भ :- मा.सौ.जयश्री गावडे यांचा दिनांक ३०/१/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २४ प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह मधील सुदर्शननगर गोलांडे चाळ येथील अनंत सहकारी पतसंस्थेमागे पि.चिं.मनपाचे जुने संडास ब्लॉक असून सदयस्थीतीत त्याचा कोणीही वापर करत नाही.

त्यामुळे बंद स्थि तीत असलेले सदर संडास ब्लॉक पाडून ते त्वरीत हटविण्यात व त्याचा राडारोडा उचलण्यात यावा. तरी सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३३ विषय क्र. ५
दि. ३०/१/२०१५ विभाग : स्थापत्य व क्रिडा विभाग
सुचक : मा. निलेश बारणे अनुमोदक: मा. अँड..संदिप चिंचवडे

संदर्भ :- मा.निलेश बारणे यांचा दिनांक ३०/१/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

थेरगांव स.नं.२२ आरक्षण क्रमांक ६२८ खेळाचे मैदान ( Play Ground) या खेळाच्या मैदानास कै.चंदू मल्हारी बारणे क्रिडांगण असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा.सभाध्यक्ष ओव्हाळ शेखर अशोक यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
[ ओव्हाळ शेखर अशोक ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब क्षेत्रीय कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभा/२/कावि/ ६३ /२०१५.
दिनांक : ०३ / ०३ /२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत
सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना